पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

जिल्हा पोलीस राजपत्र

दि - 31.08.2018

भाग 1 - बदली /नेमणूक /पदोन्नती

क्रमांक-पोअय/पलि-२/लिपीक-नेमणुक/प्रशासकीय/२०१८ /10704 यवतमाळ, दिनांक :- 31 AUG 2018

आ दे श

खालील नमुद लिपीक कर्मचारी यांची प्रशासकीय कारणास्तव त्वरीत प्रभावाने त्यांचे नांवासमोर दर्शविल्यानुसार नेमणुक करण्यात येत आहे. त्यांनी त्वरीत त्यांचे नेमणुकीचे ठिकाणी हजर होवून कार्यभार स्विकारुन अनुपालन अहवाल सादर करावा.

अ.क्र.	लिपीक कर्मचारी यांचे नांव व पद	कोठून	कोठे
०१	श्री.एस.डी अर्कते कश्रेली	बदलीवर हजर झाल्याने	विभागीय चौकशी शाखा (टंकलेखक)
०२	श्रीमती आयशा रब कश्रेली	बदलीवर हजर झाल्याने	सहा.आस्था.लिपीक-५ (२००१ ते २७२१तसेच बि.स विभाग यांचे सेवापटाबाबत संपुर्ण काम)
०३	श्रीमती एस.एस.सर्यवंशी कश्रेली	सहा.आस्थापना लिपीक-५	पोलीस पाटील संबधी देयक व पत्रव्यवहार,सप्ताहीक रजा
०४	श्रीमती व्ही.आर.हजारे कश्रेली	बदलीवर हजर झाल्याने	सहा.आस्थापना लिपीक-१ (१ ते ५००)
०५	श्री डि.ए.महल्ले कश्रेली	बदलीवर हजर झाल्याने	सहाय्यक पेन्शन लिपीक
०६	श्री.व्ही.जे.जाधव कश्रेली	बदलीवर हजर झाल्याने	प्रशिक्षण लिपीक (गॅझेट)
०७	कू.एम.एम.तडसे कश्रेली	बदलीवर हजर झाल्याने	सहाय्यक विभागीय चौकशी (कसुरी)
०८	श्री.एस.डी.मुदावणे कश्रेली	भनिनि लिपीक	सहाय्यक वेतन लिपीक-२
०९	कु.निशीगंधा देवतळे कश्रेली	प्रशिक्षण लिपीक (गॅझेट)	भनिनि लिपीक
१०	श्रीमती एम.जी.भगत कश्रेली	बदलीवर हजर झाल्याने	DCPS सहाय्यक
११	श्री.पी.एम.राणे वश्रेली	-	DCPS चे संपुर्ण काम
१२	श्रीमती.एन.ए.बोडखे वश्रेली	बदलीवर हजर झाल्याने	अधि./लिपीक यांचे सर्हिस बुकामध्ये नोदी घेणे पत्रव्यवहार शाखा

तसेच पत्रव्यवहार लिपीक-७ कडील शासकिय निवासस्थान वाटप/तात्पुरते सफाईकामगार नियुक्ती करणे/घर भाडे भत्ता हे विषय पत्रव्यवहार लिपीक-५ कडे देण्यात येत आहे.

(एम.राज कुमार)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

क्रमांक: पोअय/आलि-80 सी/आंजिब/जाधव/गोंदिया/ 10700 /2018 यवतमाळ, दिनांक :- 31 AUG 2018

आ दे श

पोना/1626 नितीन जाधव, यांची पोलीस अधीक्षक, गोंदिया यांचे आदेश क्रमांक SPG/H.C/A.B/YAT/3066/2018 दिनांक 21/08/2018 अन्वये पोलीस अधिक्षक, यवतमांळ या घटकात आंतरजिल्हा बदली करण्यात आल्याने त्यांना गोंदिया येथून बदलीवर दिनांक 21/08/2018 रोजी म. नंतर कार्यमुक्त करण्यात आल्याने ते दिनांक 23/08/2018 रोजी म. पूर्वी या घटकात बदलीवर हजर झाले आहे.

पोना/1626 नितीन जाधव, यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/236/87 दिनांक 16/2/1987 तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-2010/प्र.क्र. 210/10/12 दिनांक 03/06/2011 अन्वये सेवाजेष्ठतेची अट मान्य असल्याचे बंधपत्र दिलेले आहे त्यान्वये त्यांची यवतमाळ जिल्हयात सेवाजेष्ठता लावण्यात येईल.

पोना/1626 नितीन जाधव, यांना या जिल्हयाचे आस्थापनेवरील **ब.क्र.468** हा देण्यात येत असुन त्यांना पो.स्टे यवतमाळ ग्रामीण येथे नेमणुक करण्यात येत आहे.

(एम.राज कुमार)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

क्रमांक-पोअय/पलि-२/लिपीक-नेमणुक/प्रशासकीय/२०१८ 10705 यवतमाळ, दिनांक :- 31 AUG 2018

आ दे श

खालील नमुद लिपीक कर्मचारी यांची प्रशासकीय कारणास्तव त्वरीत प्रभावाने त्यांचे नांवासमोर दर्शविल्यानुसार नेमणुक करण्यात येत आहे. त्यांनी त्वरीत त्यांचे नेमणुकीचे ठिकाणी हजर होवून कार्यभार स्विकारुन अनुपालन अहवाल सादर करावा.

अ.क्र.	लिपीक कर्मचारी यांचे नांव व पद	कोठून	कोठे
१	श्रीमती व्ही.के.आढाव कश्रेली	आवक लिपीक	पोलीस कल्याण निधीचे कॅशबुक सांभाळतील
२	कु.एम.डब्लु जाधव कश्रेली	नविन नियुक्ती	प्र.शाखा कश्रेली अढाव यांचेकडील काम
३	श्री.सी.डी.पाल कश्रेली	नविन नियुक्ती	प्र.शाखा कश्रेली अढाव यांचेकडील काम

(एम.राज कुमार)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

भाग 2 - रजा

क्र. प्रलि/५१-डी/अर्जित रजा-पोअधिकारी/ 10707 /२०१८ यवतमाळ, दिनांक - 31 AUG 2018

आदेश

खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे **अर्जित रजा** मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह कायदा व सुव्यवस्थेच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

अ.क्र.	नांव / पदनाम	मंजूर रजेचा कालावधी	कार्यभार
१.	**श्री.अनिल शिवराम राऊत** सहायक पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा.	दि.३१.०८.२०१८ ते ११/०९/२०१८ पर्यंत १२ दिवस अर्जित रजा मंजूर. (वडिलांचे निधन झाल्याने पुढील धार्मिक विधीकरिता)	पोउपनि/राजेंद्र मिश्रा, जि.वि.शाखा

वरील नमुद पोलीस अधिकारी यांनी रजा संपताच कर्तव्यावर हजर व्हावे तसेच रजेवर गेल्याची व रजा उपभोगुन परत आल्याची दिनांक व वेळ न चुकता या कार्यालयास कळवावी .

(मा.पो.अ.यांचे आदेशान्वये)

(एस.जी.सिंगारकर)
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

क्र. आशा-५/५१-डी/ वा.स. रजा /मपोशि-२१३२/ 10681 यवतमाळ दिनांक 31 AUG 2018

आदेश

मपोशि/२१३२ निशा शेंडे नेमणुक, जि.वी.शा.यांना या कार्यालयाचे आदेश क्र सआली -५/५१-डी/बालसं. रजा /मपोशि-२१३२/२०१८/८३२५/ दि.२०/६/२०१६ अन्वये, बालसंगोपन रजा मंजूर करण्यात आली असुन त्यांनी वाढीव बालसंगोपन रजेची मागाणी केल्याने त्यांची शासन निर्णय वित्त विभाग, अरजा/१४०९/प्र.क्र.०९/सेवा ६-,मंत्रालय दिनांक २४/८/२००९ प्रमाणे ६० दिवस वाढीव संगोपन मंजूर करण्यात येत आहे.

(मा.पो.अधि.यांचे मान्यतेने)

अर्जित रजा - ६० दिवस

(अनिलसिंह गौतम)
पोलीस उपअधीक्षक,(मुख्या)

क्रमांक :- पोअय/सआली-3/कर्तव्यावर हजर-कर्मचारी/10668/2018 यवतमाळ, दिनांक :- 31 AUG 2018

विषय :- कर्तव्यावर हजर करुन घेणे बाबत...

--- 000 ---

सफौ/287 सुनिल चोपडे नेमणुक, पोलीस स्टेशन यवतमाळ हे दि. 24/12/2017 ते 07/06/2018 (162 दिवस) सिक रजेवर होते. तरी सदर कर्मचारी यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे. तसेच त्यांचा दिनांक 24.12.2017 ते 07.06.2018 (162 दिवस) पर्यतचा सिक कालावधी खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

अ.क्र.	कालावधी	एकुण दिवस	रजा
1.	24.12.2017 ते 07.06.2018	162 दिवस	परावर्तीत रजा

(अनिलसिंह गौतम)
(प्र.) पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधिक्षक,यवतमाळ यांचे करीता

क्रमांक -सआली-२/परिवर्तीत रजा/पोहेकॉ-८५३/२०१८. 10677 यवतमाळ, दिनांक- 31 AUG 2018

आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा नमुद हे आज दि.३१.०८.२०१८ रोजी सिक मधुन कर्तव्यावर हजर होणेकरीता आले आहे तरी यांना हजर करुण घेण्यात येत आहे. व नमुद वैद्यकीय कालावधी हा म.नागरी रजा नियम १९८१ चे नियम क्रमांक (६१) चे अधिन राहुन खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

अ.क्र	कर्मचारी नाव/पद/बनं	नेमणुक	मंजूर वैद्यकीय कालावधी
१	पोहेकॉ/८५३ शामराव पावडे	पो.मु यवतमाळ	दि.०८.०८.२०१८ ते दि.३१.०८.२०१८ पावेतो एकुण २३ दिवस परिवर्तीत रजा

(अनिलसिंह गौतम)
प्र.पोलीस उप अधीक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

क्रमांक :- पोअय/सआली-3/कर्तव्यावर हजर-कर्मचारी/10669/2018 यवतमाळ, दिनांक :-

31 AUG 2018

विषय :- कर्तव्यावर हजर करुन घेणे बाबत...

--- 000 ---

पोहवा/1380 प्रतापसिंह कछवाह नेमणुक, पोलीस स्टेशन यवतमाळ (शहर) हे दि. 11/11/2017 ते 05/06/2018 (207 दिवस) सिक रजेवर होते. तरी सदर कर्मचारी यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे. तसेच त्यांचा दिनांक 11.11.2017 ते 05.06.2018 (207 दिवस) पर्यतचा सिक कालावधी खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

अ.क्र.	कालावधी	एकुण दिवस	रजा
1.	30.05.2018 ते 05.06.2018	7 दिवस	अर्जीत रजा
2.	11.11.2017 ते 29.05.2018	200 दिवस	परावर्तीत रजा

(मा. पो. अ. यांचे मान्यतेने)

(अनिलसिंह गौतम)
(प्र.) पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचे करीता

क्रमांक:- पोअय/सआली - ५/प्रसुती रजा/पो.आहार/ मपोशि-२३१९ /२०१८ 10680 यवतमाळ दिनांक

31 AUG 2018

आदेश

मपोशि/२३१९ सोनाली तायडे, नेमणुक - पो.स्टे.नेर यांना त्यांचे पहिली प्रसुती करीता महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८१ मधील नियम ७४ चे तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र.अ.रजा-१४०९/प्रक्र८/०९सेवा-६, दिनांक २४/०८/२००९ अन्वये रजेवर सुटल्याचे तारखेपासुन **१८० दिवस प्रसुती रजा (विशेष रजा)** तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/२८अे/४९३७/महिला पोलीस-विशेष पोषण अनुदान/३३/(०२)२०१८ अन्वये विशेष पोषण आहार अनुदान रु.५०००/- पोलीस कल्याण निधीतुन मंजूर करण्यात येत आहे.

(मा.पो.अधि.यांचे मान्यतेने)

(अनिलसिंह गौतम)
पोलीस उपअधीखक,(मुख्या)
यवतमाळ

क्रमांक :- पोअय/सआलि-1/र.प्र.स./गटवर्ष 2017-2020/ 10675 /2018 यवतमाळ, दिनांक :- 31 AUG 2018

आ दे श

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांनी त्यांच्या कुटूंबातील सदस्यासह त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे गटवर्ष **2017-2020** करीता स्वत: व कुटूंबासह स्वत:चे मुख्यालय ते घोषीत ठिकाणी शासन निर्णय वित्त विभाग क्र. रप्रस/1994/184/सेवा-5,दि.28.3.1995 व शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण-1000/प्रक्र/70/सेवा-5 दिनांक 11.ऑगष्ट 2000 अन्वये तसेच शासन निर्णय क्र. संकीर्ण-1000/प्रक्र/70/सेवा-5 दिनांक 10.2.2001 व रप्रस-1114/प्र.क्र.11/सेवा-5 दिनांक 10/06/2015 तरतुदीनुसार रजा प्रवास सवलत अर्जीत रजेमधुन अल्पकालावधी करिता (07 दिवसाचे आत) रजा मंजुर करण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र.र प्र स -1994/184/सेवा-5 दिनांक 28-03-1995 व दि 10-01-2001 मधील निकर्ष पूर्ण करित असल्याने व पोलीस कर्मचारी यांचे अर्जावरुन ठाणेदारांचे पडताळणी प्रमाणपत्रा वरुन दि 10-02-2001 च्या शासन निर्णयानुसार अपत्यांची संख्या सिमित असुन मागणी केलेल्या रजेमध्ये प्रवास जवळच्या व किफायतशीर दराने करुन सार्वजनिक वाहन एस.टी./रेल्वेने करुन प्रवासाच्या प्रत्यक्ष टिकीटा सादर करण्याच्या अटीवर मंजुर करण्यांत येत आहे.

तसेच पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुबंई यांचे पत्र क्रमांक पोमसं/28-अे/4937/पो.कर्म.महा.दर्शन/184/2016 दिनांक 19/09/2016 अन्वये सदर कर्मचारी हे रजा प्रवास रजेवर जाते वेळी त्यांना पोलीस कल्याण निधी मधुन प्रत्येकी रु.1000/- एकरकमी अनुदान म्हणुन देण्यात यावे.

अ क्र	पदनाम	बन	नाव	नेमणूक	कोठून	कोठे	कुटुंबातील व्यक्तीची संख्या
01	पोना	256	संजय अभ्यकर	पो.अ.वाचक शाखा	यवतमाळ	सावंतवाडी	04
02	पोना	346	निलेश उंचेकर	पो.अ.वाचक शाखा	यवतमाळ	सावंतवाडी	04
03	पोना	303	निलेश दायमा	पो.अ.वाचक शाखा	यवतमाळ	कुडाळ	04
04	पोहवा	388	विजय भगत	पो.मु.यवतमाळ	यवतमाळ	सावंतवाडी	04
05	पोना	134	दिगांबर उपरे	पो.स्टे मुकूटबन	यवतमाळ	सांवतंवाडी	04
06	पोना	04	सुशिल चेके	पो.स्टे दारव्हा	यवतमाळ	गणपती पुळे	04
07	सपोउपनि	185	रमेश नेमाडे	पो.स्टे लोहारा	यवतमाळ	सांवतंवाडी	04

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रति,

क्रमांक :- पोअय/सआलि-1/अर्जीत रजा-पो.कर्मचारी-2018-2019/ 10676 /2018 यवतमाळ, दिनांक :- 31 AUG 2018

आ दे श

खालील नमुद कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांची रजा,म.ना.सेवा (रजा) नियम 1981 मधील नियम 50 अन्वये सन **2018-2019** करिता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रामणे अर्जीत रजा मंजूर करण्यांत येत आहे.

अ.क्र	पदनाम बन	मंजुर रजा	कारण	नेमणूक
01	पोशि/68 रिशी लांजेवार	30 दिवस	घर बाधंकामा करीता	पो.मु.यवतमाळ
02	पोशि/77 प्रिति निळेकर	30 दिवस	धार्मिक विधी बाबत	जि.वि.शा
03	पोशि/114राम मस्के	30 दिवस	धार्मिक कारणासाठी	पो.मु.यवतमाळ
04	पोहवा/127 श्रीराम देठे	15 दिवस	जुने घर दुरुस्ती करीता	पो. नि. कक्ष
05	पोशि/154 आकाश पाझारे	30 दिवस	घर बांधकाम	पो.मु.यवतमाळ
06	पोहवा/176 सुरेश झोटींग	30 दिवस	धार्मिक कार्यक्रम	पो. स्टे यवतमाळ (ग्रा)
07	सपोउपनि/185 रमेश नेमाडे	15 दिवस	धार्मिक कार्यक्रम	पो. स्टे. लोहारा
08	पोना/292 रविंद्र जाधव	15 दिवस	धार्मिक विधी करीता	जि.वि.शा शाखा
09	सपोउपनि/310 अशोक कुन्हाडकर	30 दिवस	धार्मिक कामा करीता	पो.मु.यवतमाळ
10	पोशि/313 योगेश काकडे	30 दिवस	घर बांधकाम	पो.मु.यवतमाळ
11	पोशि/314 अभिषेक वानखडे	30 दिवस	घर बांधकाम	पो.मु.यवतमाळ
12	पोशि/343 आकाश पातुरकर	30 दिवस	धार्मिक कामा करीता	वाहतुक उपशाखा पुसद
13	पोशि/362 राजु दिघाडे	30 दिवस	घर बांधकाम	पो.मु.यवतमाळ
14	पोहवा/431 सुभाष वंजारी	15 दिवस	धार्मिक कामा करीता	जि.वि.शा
15	पोशि/444 पवन तेल्लेवार	15 दिवस	धार्मिक कारण	मो.प.विभाग यवतमाळ
16	सपोउपनि/478 अशोक स्वामी	15 दिवस	धार्मिक काम	पो.स्टे.शिरपुर
17	पोना/497 अभिमन्यु चव्हाण	15 दिवस	मुलीच्या लग्ना करीता	पो.स्टे. खंडाळा
18	पोहवा/244 विजय चव्हाण	30 दिवस	धार्मिक कारणा करीता	पो.स्टे. वसंतनगर

नमुद पोलीस कर्मचारी यांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पाहुन त्यांनी तसेव कामाची निकट पाहुन आळीपाळीने रजेवर सोडावे व रजेवर सोडल्याची तारीख न चूकता या कार्यालयास कळवावी.

(अनिलसिंह गौतम)
पोलीस उप अधिक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ
करिता

भाग 3 - वेतन/भत्ते / रोख्रिकरण

निरंक

भाग 4 - बक्षिस / मानधन

निरंक

भाग 5-शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्र :डिपी/३१-बी/अं.आ./नवप्रविष्ठ-पोशि-७३५ अजय राउत / 10698 /२०१८ यवतमाळ दि. 31 AUG 2018

अंतिम आदेश

अपचा-यांचे नांव :- नवप्रविष्ठ पोशि/७३५ अजय राउत (माझी सैनिक) नेमणूक पो.मु. यवतमाळ.

दोषारोप :-

१) आपली नवप्रविष्ठ पोशि/७३५ अजय राउत (माझी सैनिक) यवतमाळ जिल्हा पोलीस दलात दि. १०/०३/२०१४ रोजी नवप्रविष्ठ पो.शि.म्हणुन नेमणुक करण्यात येवुन पोलीस मुख्यालयातील नवप्रविष्ठांचे मुलभुत प्रशिक्षणा दरम्यान बरेच वेळा गैरहजर राहिलेत. नेहमी गैरहजर राहण्याची सवयीचे अहात तसेच कर्तव्यावर असता मद्य प्राशन करुन गैरवर्तन करण्याचे सवयीचे आहात. दि. १२/११/२०१४ रोजी पो.मु. येथिल प्रशिक्षण काळात दारु प्राशन करुन असभ्य वर्तन करित असल याचे आढळुन आलेत. वैद्यकिय तपासणीत मद्यर्काच्या अमलाखाली असल्याचे दिसुन आले आहेत.

२) दि.३०/०७/२०१६ रोजी पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ,मुंबई येथे मुलभंत पोलीस पंशिक्षणा करिता पाठविण्यात आले असता प्रशिक्षणा दरम्यान दारुच्या नशेत आढळुन आल्याने दि.०६/०३/२०१७ रोजी मुळ घटकात परत करण्यात आले असता दि.०८/०३/२०१७ रोजी पोलीस मुख्यालय येथे हजर होउन तेव्हापासुन कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता पुर्व परवानगी न घेता परस्पर कर्तव्यावर अनाधिकृतपणे गैरहजर आहात.

३) पो.मु. यवतमाळ येथिल नव प्र. मुलभुत प्रशिक्षणा दरम्यान माहे ०४/२०१४ ते माहे ०३/२०१७ पावेतो एकुण ४२६ दिवस कर्तव्यावर अनाधिकृतपणे गैरहजर राहिले बाबत बिन पगारी रजा मंजुर करण्यात आली. गैरहजर कालावधीत दि.२१/१०/२०१४ रोजी पुलगाव येथे बाजारात सार्वजनिक ठिकाणी दारु पिउन धुमाकुळ करित असल्याचे मिळुन आल्याने पो.स्टे. पुलगाव येथे इस्तेगाशा क्र.११७/२०१४ कलम ११०,११२,११७ मु.पो. अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला

अशा रितीने नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदावर नेमणूकीस असतांना व अल्पसेवा असतांना प्रशिक्षणा दरम्यान पुर्व परवानगी न घेता गैरहजर राहुन तसेच मद्यर्काचे सेवन करुन बेजबाबदार,बेशिस्त व पोलीस खात्याच्या शिस्तीला न शोभणारे वर्तन करीत असल्याचे दिसुन आले आहे .

उपरोक्त कसुरी प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्रमांक:डिपी/३१-बी/वि.चौ./नवप्रविष्ठ-पोशि/ ७३५ अजय राउत/ १०२०२/२०१७ दि.०२/११/२०१७ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात येवुन सदर विभागीय चौकशी मध्ये नवप्रविष्ट पोशी पदावर अल्पसेवा असताना प्रशिक्षणा दरम्यान पुर्वपरवाणगी न घेता गैरहजर राहुन मद्यर्काचे सेवण करुन बेजबाबदार बेशिस्त व पोलीस खात्यास न शोभणारे वर्तण करीत असल्याचे निष्पन्न होवुन दोषारोप क्र. १ ते ३ पुर्नतः सिध्द झाले आहेत. शिस्तप्रिय पोलीस खात्यातील शिस्तीबाबत कोणतीही आस्था, कल व ओढ असल्याचे दिसुन येत नाही. आपल्या अशा कर्तव्यातील बेशिस्त व नवप्रविष्ठ प्रशिक्षण काळात सतत गैरहजर राहण्याच्या वर्तना बाबत **आपणास मुबंई पोलीस (शिक्षा आणी अपीले) नियम १९५६मधिल नियम ३ (१) (३) चे तरतुदीनुसार सेवेतून बडतर्फी (Dismissal) ही शिक्षा का देण्यात येवू नये ?** म्हणुन दि.०२/०७/२०१८ राजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली सदर नोटीस दि.०३/०७/२०१८ रोजी स्विकारुन स्पष्टिकरण सादर करण्यास दिलेल्या मुदतीनंतर आणखीन १५ दिवस मुदतवाढ मिळण्याची विनंती केल्याने अतिरिक्त १५ दिवस मुदतवाढ देण्यात आली. दि.०२/०८/२०१८ रोजी मुदतीत स्पष्टिकरण सादर केले आहे. कसुरी प्रकरणी मोखीक म्हणने मांडण्याकरीता दि.१६/०८/२०१८ राजी समक्ष आज्ञाकित कक्षात बोलावुन मोखीक म्हणने एकुन घेण्यात आले.स्पष्टिकरण व मोखीक म्हणने समाधान कारक नाही. अनाधिक्रत गैरहजर राहाण्याचे व बेशिस्त वर्तणात सुधारणा झाल्याचे दिसुन येत नाही. कर्तव्य बजावण्यास कोणतीही आस्था,कल व ओढ असल्याचे दिसुन येत नाही. प्रस्थावित शिक्षा कायम करुन अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

मी पोलीस अधिक्षक यवतमाळ,याव्दारे अपचारी नवप्रविष्ठ पोशी ७३५ अजय राउत (माझी सैनिक) यवतमाळ जिल्हा पोलीस दल यांना **मुबंई पोलीस (शिक्षा आणी अपीले) नियम १९५६मधिल नियम ३ (१) (३) चे तरतुदीनुसार सेवेतून बडतर्फी (Dismissal) ही शिक्षा** आदेश स्विकारलेच्या दिनांक पासुन देण्यात येत आहे.

अपचारी जर शिक्षेणे व्यथित होत असतील तर हा आदेश स्विकारलेच्या दिनांका पासुन ६० दिवसाचे आत मा.पोलीस उप महानिरिक्षक,अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचे कडे या कार्यालया मार्फत दोन प्रतित अपिल अर्ज सादर करु शकतात.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

क्र :डिपी/३१-बी/अंतिम आदेश/नवप्रविष्ठ-पोशि-२३६९दराडे/ 10695 /२०१८ यवतमाळ दि. 31 AUG 2018

अंतिम आदेश

अपचा-यांचे नांव :- नवप्रविष्ठ पोशि/२३६९ समाधान दराडे (माझी सैनिक) नेमणूक पो.मु. यवतमाळ.

दोषारोप :-

१)नवप्रविष्ठ पोशि/२३६९ समाधान दराडे (माझी सैनिक) यवतमाळ जिल्हा पोलीस दलात दि. ०४/०९/२०१३ रोजी भरती झाले आहेत. आपणास दिनांक ०९/११/२०१३ रोजी पुढिल मुलभुत प्रशिक्षणा करिता पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ,मुंबई येथे पाठविण्यात आले असता प्रशिक्षणा दरम्यान दारुच्या नशेत आढळुन आल्याने वैद्यकिय तपासणी करण्यात येवुन त्यांना प्राचार्य पो.प्र. केंद्र मरोळ, मुंबई यांनी दि. २१/०५/२०१४ रोजी मुळ घटक पो.मु. यवतमाळ येथे परत पाठविले. मुळ घटकात हजर होवुन. दि. ११/११/२०१४ रोजी पोलीस मुख्यालय येथिल नवपोलीस मुलभुत प्रशिक्षणा दरम्यान दारुच्या नशेत आढळुन आले. अशा प्रकारे आपण नेहमी कर्तव्यावर गैरहजर राहण्याचे व मद्यर्काचे सेवन करण्याचे सवयीचे आहात. प्रशिक्षण काळात दारु प्राशन करुन पोलीस खात्यास अशोभनीय, शिस्तगाहय, असभ्य, गैरवर्तन करित असल्याचे दिसुन आले आहे.

२) तसेच दि.३०/०७/२०१६ रोजी पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ,मुंबई येथे मुलभंत पोलीस पंशिक्षणा करिता पाठविण्यात आले असता नवरात्र व मोहरम बंदोबस्ता दरम्यान दि. ०६/१०/२०१६ रोजी पोलीस संकुल तुळजापुर येथे दारुच्या नशेत आढळुन आल्याने अप नं.२९८/२०१६ कलम ८५ (१)मुबई पोलीस ॲक्ट प्रमाणे आपणावर गुन्हा नोंद करण्यात येवुन दि.१०/१०/२०१६ रोजी मुळ घटकात परत करण्यात आले असता दि.१२/१०/२०१६ ते ०३/०५/२०१७ पर्यंत कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता, पुर्व परवानगी न घेता परस्पर कर्तव्यावर अनाधिकृत गैरहजर राहिलात व कर्तव्यावर अनाधिकृत गैरहजर राहण्याच्या सवयीचे आहेत.

३) आपण पो.मु. यवतमाळ येथिल नव प्र. मुलभुत प्रशिक्षणा दरम्यान माहे ०८/२०१४ ते माहे ०४/२०१७ पावेतो कोणतीही पुर्व सुचना न देता वरिष्ठांची परवानगी न घेता एकुण ४३६ दिवस कर्तव्यावर अनाधिकृतपणे गैरहजर राहिले बाबत बिन पगारी रजा मंजुर करण्यात आली आहे. तसेच दि. १७/०६/२०१७ पासुन आज पावेतो कर्तव्यावर अनाधिकृत गैरहजर आहात. अशा रितीने नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदावर नेमणूकीस असतांना व अल्पसेवा असतांना प्रशिक्षणा दरम्यान पुर्व परवानगी न घेता गैरहजर राहुन तसेच मद्यर्काचे सेवन करुन बेजबाबदार,बेशिस्त व पोलीस खात्याच्या शिस्तीला न शोभणारे वर्तन करीत असल्याचे दिसुन येत आहे.

उपरोक्त कसुरी प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्रमांक:डिपी/३१-बी/वि.चौ./नवप्रविष्ठ-पोशि/२३६९ समाधान दराडे/ ११३२२/२०१७ दि.१३/११/२०१७ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात येवुन सदर विभागीय चौकशी मध्ये नवप्रविष्ट पोशी पदावर अल्पसेवा असताना प्रशिक्षणा दरम्यान पुर्वपरवाणगी न घेता गैरहजर राहुन मद्यकाचे सेवण करुन बेजबाबदार बेशिस्त व पोलीस खात्यास न शोभणारे वर्तण करीत असल्याचे निष्पन्न होवुन दोषारोप क्र. १ ते ३ पुर्नत: सिध्द झाले आहेत. शिस्तप्रिय पोलीस खात्यातील शिस्तीबाबत कोणतीही आस्था, कल व ओढ असल्याचे दिसुन येत नाही.आपल्या अशा कर्तव्यातील बेशिस्त

F.O-314

व नवप्रविष्ठ प्रशिक्षण काळात सतत गैरहजर राहण्याच्या वर्तना बाबत **आपणास मुबंई पोलीस (शिक्षा आणी अपीले) नियम १९५६मधिल नियम ३ (१) (३) चे तरतुदीनुसार सेवेतून बडतर्फी (Dismissal) ही शिक्षा का देण्यात येवू नये ?** म्हणुन दि.०२/०७/२०१८ राजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली सदर नोटीस दि.०४/०७/२०१८ रोली स्विकारुन स्पष्टिकरण सादर करण्यास दिलेल्या मुदतीनंतर आणखीन १५ दिवस मुदतवाढ मिळण्याची विनंती केल्याने अतिरिक्त १५ दिवस मुदतवाढ देण्यात आली. दि.०२/०८/२०१८ रोजी मुदतीत स्पष्टिकरण सादर केले आहे. कसुरी प्रकरणी मोखीक म्हणने मांडण्याकरीता दि.१६/०८/२०१८ राजी समक्ष आज्ञाकित कक्षात बोलावुन मोखीक म्हणने एकुन घेण्यात आले.स्पष्टिकरण व मोखीक म्हणने समाधान कारक नाही. अनाधिक्रत गैरहजर राहाण्याचे व बेशिस्त वर्तणात सुधारणा झाल्याचे दिसुन येत नाही. कर्तव्यबजावण्यास कोणतीही आस्था,कल व ओढ असल्याचे दिसुन येत नाही. प्रस्थावित शिक्षा कायम करुन अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

मी पोलीस अधिक्षक यवतमाळ,याव्दारे अपचारी नवप्रविष्ठ पोशि/२३६९ समाधान दराडे (माझी सैनिक) यवतमाळ जिल्हा पोलीस दल यांना **मुबंई पोलीस (शिक्षा आणी अपीले) नियम १९५६मधिल नियम ३ (१) (३) चे तरतुदीनुसार सेवेतून बडतर्फी (Dismissal) ही शिक्षा** आदेश स्विकारलेच्या दिनांक पासुन देण्यात येत आहे.

अपचारी जर शिक्षेणे व्यथित होत असतील तर हा आदेश स्विकारलेच्या दिनांका पासुन ६० दिवसाचे आत मा.पोलीस उप महानिरिक्षक,अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचे कडे या कार्यालया मार्फत दोन प्रतित अपिल अर्ज सादर करु शकतात.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

भाग 6 - प्रशिक्षण व इतर

बिनतारी संदेश

प्रति - ठाणेदार बिटरगाव/उमरखेड/वणी/महागाव/आर्णि/कळंब/राळेगाव/दारव्हा/दिग्रस.

पासुन - पोलीस अधीक्षक, यवतमाळ

हस्ते - राखिव पोलीस निरीक्षक, पो. मु./स्था.गु.शा./रोखपाल पो.मु./प्रवासभत्ता लिपिक/आकस्मिक लिपिक /डिपोजी.

31 AUG 2018

क्रमांक-पोअय/आशा/प्रशि/डिटीएस कोर्स/ /२०१८ / 10692 यवतमाळ दि.- ३१.०८.२०१८

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक येथे दिनांक सेवांतर्गत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षणाकरीता खालील पोलीस कर्मचारी यांची निवड करण्यात आली आहे. सदर पोलीस कर्मचारी प्रशिक्षणाचे ठिकाणी सर्व तयारी निशी दिनांक ०२.०९.२०१८ रोजी २०.०० वा. चे पुर्वी न चुकता हजर राहतील. तसेच प्रशिक्षणास रवाना झाल्याबाबत व प्रशिक्षण पुर्ण करुन आल्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. **सदर प्रशिक्षणास जाणेस टाळाटाळ केल्यास संबंधितांविरुध्द गंभीर दखल घेतली जाईल (.)**

अ.क्र.	पो. कर्म. नाव	नेमणुक	प्रशिक्षण खर्च रु.	प्रशिक्षण कालावधी	प्रशिक्षण विषय
१	पोशि/ २७०८ रमन दहिफळे	बिटरगाव	१६९२/- रु. प्रत्येकी	दि. ०३.०९.२०१८ ते ०८.०९.२०१८	सञ क्र. १६४-एन.डी.पी.एस अंतर्गत दाखल झालेल्या गुन्हयांचा तपास आणि पोलीस तपासात अंगुलीमुद्रा चे महत्व
२	पोशि/ २६५९ प्रशांत कदम	उमरखेड			
३	पोशि/ २६५३ रणजित बंसोड	वणी			
४	पोशि/ २६५२ बालाजी हिवरे	महागाव	१८३७/- रु. प्रत्येकी	दि. ०३.०९.२०१८ ते ०८.०९.२०१८	सञ क्र. १६५-घटनास्थळाचा तपास व मनुष्यवध प्रकरणांचा तपास आणि पोलीस तपासात अंगुलीमुद्रा चे महत्व
५	पोशि/ २६५१ विकास खंडारे	आर्णी			
६	पोशि/ २६४७ सचिन गडपवार	कळंब			
७	पोशि/ २६४४ प्रकाश मुंडे	राळेगाव	२७५६/- रु. प्रत्येकी	दि. ०३.०९.२०१८ ते १५.०९.२०१८	सञ क्र. २४५- गुन्हे दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याकरीता शास्त्रोक्त पध्दतीने तपास
८	पोशि/ २६१६ संजय साबळे	दारव्हा			
९	पोशि/ २६१३ संजय गोरे	दिग्रस			

२/- निवड करण्यात आलेले सदर कर्मचारी यांना प्राचार्य गुन्हे अन्वेशन प्रशिक्षण विद्यालय, नाशिक येथे दिनांक ०२.०८.२०१८ रोजी सायंकाळी २०.०० वाजता पावेतो हजर राहणेबाबत सुचना द्याव्यात.

(कार्यालय दुरध्वनी क्रमांक- ०२५३-२३५२१६४)

(अनिलसिंह गौतम)
प्र. पोलीस उप अधी. (मुख्या.)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

अतितात्काळ/कालमर्यादा

क्र.प्रलि/८०-सी/प्रशिक्षण-सोशल डिफेन्स/एमपीए-नाशिक/ 10644 /२०१८ यवतमाळ, दिनांक- 31 AUG 2018

आदेश

मा.संचालक, महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी, नाशिक यांचे बिनतारी संदेश क्र.एमपीए-नाशिक/इन-सर्व्हिस/एनआयएसडी-३/२०१८/५२१, दिनांक २७/०८/२०१८ अन्वये **दिनांक ०४.०९.२०१८ ते ०६.०९.२०१८** या कालावधीत **SOCIAL DEFENCE ISSUES** या विषयावरील प्रशिक्षण **महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी, नाशिक** येथे आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणाकरिता **सहायक पोलीस निरीक्षक/अमर विजयसिंह पाटील, पोस्टे.यवतमाळ शहर** यांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार सपोनि/अमर पाटील यांनी दिनांक ०३/०९/२०१८ रोजी सायंकाळपर्यंत महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी, नाशिक येथे न चुकता हजर राहावे. प्रशिक्षणास रवाना झाल्याबाबत व प्रशिक्षण पुर्ण करुन आल्याबाबत या कार्यालयास कळवावे. सदर प्रशिक्षण हे साध्या गणवेषात असुन, प्रशिक्षणास जातेवेळी ओळखपत्र तसेच महाराष्ट्र कुटुंब आरोग्य योजना कार्ड सोबत घेवुन जावे. प्रशिक्षणास जाणेकरीता टाळाटाळ केल्यास आपणाविरुध्द गंभीर दखल घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

(पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये)

(एस.जी.सिंगारकर)
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करिता.

अतितात्काळ/कालमर्यादा

क्र.प्रलि/८०-सी/प्रशिक्षण/एफ ॲण्ड टी-१०/ एमआयए-पुणे/ 10645 /२०१८ यवतमाळ, दिनांक-३१/०८/२०१८

3 1 AUG 2018

आदेश

मा.संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र इन्टेलिजन्स ॲकॅडमी, पुणे यांचे बिनतारी संदेश क्र. MIA/TRG/F & T-१३/२०१८/१४५० पुणे, दिनांक २०.०८.२०१८ अन्वये **दिनांक ०३.०९.२०१८ ते ०७.०९.२०१८** या कालावधीत **FUNDAMENTALISM & TERRORISM** या विषयावरील प्रशिक्षण महाराष्ट्र इन्टेलिजन्स ॲकॅडमी, एस.आर.पी.एफ.ग्रुप-०१ कॅम्पस, रामटेकडी, हडपसर, पुणे येथे आयोजीत करण्यात आलेले आहे.

वरील नमूद प्रशिक्षणाकरिता **सहायक पोलीस निरीक्षक/शैलेश लहुजी ठाकरे, नेमणूक दशहतवाद विरोधी कक्ष, यवतमाळ** यांची निवड करण्यात आली आहे. तरी सपोनि/शैलेश ठाकरे, दहशतवाद विरोधी कक्ष, यवतमाळ यांनी दि.०२/०९/२०१८ रोजी रात्री २०.०० वाजता पावेतो महाराष्ट्र इन्टेलिजन्स ॲकॅडमी, एस.आर.पी.एफ.ग्रुप-०१ कॅम्पस, रामटेकडी, हडपसर, पुणे येथे न चुकता हजर राहावे. प्रशिक्षणास रवाना झाल्याबाबत व प्रशिक्षण पुर्ण करुन आल्याबाबत या कार्यालयास कळवावे. सदर प्रशिक्षण हे साध्या गणवेषात असुन, प्रशिक्षणास जातेवेळी **रोखपाल पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांचेकडून रु. १४००/- (अक्षरी रुपये चौदाशे फक्त)** प्रशिक्षण निधी तसेच ओळखपत्र, पेन ड्राईव्ह, स्पोर्ट ड्रेस, स्पोर्ट शुज, रिलीव्हींग मेमो सोबत घेवुन जावे. प्रशिक्षणास जाणेकरीता टाळाटाळ केल्यास आपणाविरुध्द गंभीर दखल घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

(पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये)

(एस.जी.सिंगारकर)
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

बिनतारी संदेश

प्रति :- ठाणेदार नेर.

पासुन :- पोलीस अधीक्षक यवतमाळ

13 1 AUG 2018

हस्ते :- पोनि- जिविशा,यवत./राखिव पोलीस निरीक्षक, पो.मु. /रोखपाल पो. मु. /प्रवासभत्ता लिपिक /डीपीजी .

क्रमांक पोअय/आशा-प्रशि/ INSTALLATION SECURITY./ 10693 /२०१८ यवतमाळ दिनांक -३१.०८.२०१८

महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेदमी,एस.आर.पी.एफ.ग्रुप०१ रामटेकडी,हडपसर पुणे येथे दिनांक ०४.०९.२०१८ ते ०७.०९.२०१८ या कालावधीमध्ये INSTALLATION SECURITY प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कोर्सकरीता आपले पोलीस स्टेशन/ जिविशा. केंद्र येथील पुढील पोलीस कर्मचारी यांची निवड करण्यात आली आहे(.) खालीलप्रमाणे निवड करण्यात आलेले कर्मचारी यांना तात्काळ यासंबंधी माहिती देण्यात यावी (.)

निवड करण्यात आलेले पो. कर्मचारी			
अ.क्र.	ब.नं. व पदनाम	पो.कर्म. यांचे नाव	नेमणुक
१	पोहवा/१६३२	सुरेश सगणे	जिल्हा विशेष शाखा केंद्र, नेर

निवड करण्यात आलेले सदर कर्मचारी यांना महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेदमी,एस.आर.पी.एफ.ग्रुप०१ रामटेकडी,हडपसर पुणे येथे दि. ०३.०९.२०१८ चे २०.०० वा पावेतो हजर राहण्याबाबत तसेच सोबत मेस अग्रीम रु. ११६०/- (अक्षरी रुपये एक हजार एकशे साठ फक्त),आय कार्ड, पोलीस आरोग्य योजनेचे कार्ड, रिलिव्हींग मेमो, देय प्रवासभत्ता अग्रीम ,साधा ड्रेस सोबत घेण्याबाबत सुचना द्याव्यात. (संपर्कासाठी सञ संचालक पोनि/एम.एस. तिठे यांचा दुरध्वनी क्र.-८२७५१७६७९४)

(अनिलसिंह गौतम)

प्र.पोलीस उप अधीक्षक (मुख्या.)

पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

क्रमांक- पोअय/आस्था/प्रशि-इंटे.कलेक्शन/ 10686 /२०१८ यवतमाळ दिनांक ३१.०८.२०१८

3 1 AUG 2018

आदेश

महाराष्ट्र इंटेलिजन्स अकादमी एस आर पी एफ ग्रुप क्र १ रामटेकडी हडपसर पुणे येथे दिनांक ०३.०९.२०१८ ते ०७.०९.२०१८ या कालावधीत इंटेलिजन्स कलेक्शन टेक्नीक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असुन सदर प्रशिक्षणकरीता खालील पोलीस कर्मचारी यांची निवड करण्यात आली आहे. तरी त्यांनी प्रशिक्षणाचे ठिकाणी सर्व तयारीनिशी दि. ०२.०९.२०१८ रोजी सायंकाळी २०.०० वा चे पुर्वी न चुकता हजर राहावे. तसेच प्रशिक्षणास रवाना झाल्याबाबत व प्रशिक्षण पुर्ण करुन आल्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. **सदर प्रशिक्षणास जाणेकरीता टाळाटाळ केल्यास संबंधितांविरुध्द गंभिर दखल घेतली जाईल.**

अ.क्र.	पो कर्म नाव	नेमणुक
निवड करण्यात आलेले पो. कर्मचारी-		
.१	मपोशि/ १११८ मंजुळा पवार	लोहारा

निवड करण्यात आलेले सदर कर्मचारी यांना महाराष्ट्र इंटेलिजन्स अकादमी एस आर पी एफ ग्रुप क्र १ रामटेकडी हडपसर पुणे येथे दि. ०२.०९.२०१८ चे २०.०० वा पावेतो हजर राहण्याबाबत तसेच सोबत मेस अग्रीम रु. १४००/- ,आय कार्ड, पोलीस आरोग्य योजनेचे कार्ड, रिलिव्हींग मेमो, देय प्रवासभत्ता अग्रीम , सरकारी गणवेष, पी टी ड्रेस , नोट बुक,पेन ड्राईव्ह, पेन- पेन्सिल, योगाकरीता दरी, चादर घेण्याबाबत सुचना द्याव्यात. संपर्कासाठी दुरध्वनी क्र.-०२०-२६८२००२८ (सञ संचालक-पोनि/वर्षा घेवर,मो.क्र. ९९२३६९७१७८)

(मा.पो.अ.यांचे मान्यतेने)

(अनिलसिंह गौतम)
प्र. पोलीस उप अधीक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

क्रमांक :डीपी/३१-बी/अनाधिकृत गै.ह/न.व.प्र.पोशि-२३६९दराडे/ 10696 /२०१८ यवतमाळ दिनांक

31 AUG 2018

आ दे श

नवप्रविष्ठ पोशि-२३६९ समाधान दराडे नेमणुक पो.मु. यवतमाळ यांचा कर्तव्यावर कोणतीही पुर्व सुचना न देता पुर्व परवानगी न घेता दि.१७/०६/२०१७ ते दि.१६/०८/२०१८ (आज्ञकित कक्ष) पावेतोचा एकुन ४२६ दिवस हा अनाधिकृत गैहजर कालावधी बिनावेतन रजा मंजुर करण्यात येत आहे.

(एम.राज.कुमार)
पोलीसअधिक्षक,यवतमाळ.

क्रमांक :डीपी/३१-बी/अनाधिकृत गै.ह/न.व.प्र.पोशि-७३५ अजय/ 10697 /२०१८ यवतमाळ दिनांक

31 AUG 2018

आ दे श

नवप्रविष्ठ पोशि-७३५ अजय राउत नेमणुक पो.मु. यवतमाळ यांचा कर्तव्यावर कोणतीही पुर्व सुचना न देता पुर्व परवानगी न घेता दि.०८/०३/२०१७ ते दि.१६/०८/२०१८ (आज्ञकित कक्ष) पावेतोचा एकुन ५२७ दिवस हा अनाधिकृत गैहजर कालावधी बिनावेतन रजा मंजुर करण्यात येत आहे.

(एम.राज.कुमार)
पोलीसअधिक्षक,यवतमाळ.

—— समाप्त ——